कार्यालय नगर परिषद, वानाडोंगरी

तह. - हिंगणा, जिल्हा – नागपूर

1198

जा. क्र. न.प.वा./न.र.वि./भो. प्र. ./...../२४

दिनांक :- 23/०५/२०२४.

प्रति,

श्री संजय जगताप
रा. विजय नगर , नागपूर

विषय :- महाराष्ट्र शासनाचे नियोजन प्राधिकरण क्षेत्राचे हद्दीकरिता लागू असलेल्या एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली नुसार भोगवटा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

संदर्भ :- १. आपले दिनांक २७/१०/२०२४ अर्ज क्र. ५९६१
२. नगर परिषद कार्यालयाचे आदेश क्र. जा.क्र /न.प.वा/न.र.वि./भु.नियमि/१४०२/२०२० दिनांक २४/०३/२०२२

मौजा वानाडोगरी प.ह.क्र ४६ खसरा क्रमांक ६६,६८/३,७७ आराजी ५.३० हेक्टर अभिन्यासास संदर्भ २ अन्वये अंतिम मंजुरी देण्यात आलेली होती. श्री डी.एन.बोरकर (परवाना क्रमांक NIT २८२०) यांच्या देखरेखी खालील खालील अभिन्यासातील मूलभूत विकास कामे पूर्ण केल्याचे संदर्भ १ वरून दिसून येते उक्त अभिन्यासातील आतापर्यंत मुक्त केलेल्या भूखंडाचा ताबा घेऊन उपभोग घेण्याबाबत खालील अटी व शर्तींवर मंजुरी देण्यात येत आहे

१.सदर अभिन्यासातील परिसरात वृक्षारोपण करून त्याची निगा राखण्याची जबाबदारी विकासकाची राहील.

२. सदर अभिन्यासातील परिसरात स्वच्छता राखून परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी विकासकाची राहील.

३. सदर अभिन्यास नकाशामध्ये दर्शविलेल्या भूखंड व्यतीरिक्त विना मंजुरीने कोणतेही भूखंडावर बांधकाम करू नये केल्यास ते अवैद्य समजण्यात येईल.

४. मंजूर नकाशामध्ये दर्शविण्यात आलेल्या भूखंडात काही बदल करावयाचे झाल्यास या कार्यालयास पूर्व सूचना देऊन परवानगी घेणे आवश्यक राहील. त्याशिवाय कोणते फेरबदल मान्य करता येणार नाही.

५. मंजूर अभिन्यासाठी खुली जागा कुंपण भिंत बांधून नगरपरिषदेला विनामूल्य हस्तांतरित करावे लागेल.

६. अभिन्यासातील रस्ते सार्वजनिक रस्ताचा भाग राहील.

७. सांडपाणी सयंत्र ची देखभाल करण्याची जवाबदारी विकासक यांची राहील.

८. अभिन्यासातील विकास कामात काही कसूर ३ वर्ष पर्यंत आढळल्यास त्याची जवाबदारी विकासक यांची राहील.

मुख्याधिकारी,
नगर परिषद, वानाडोंगरी.

कार्यालय नगर परिषद वानाडोंगरी ता. हिंगणा जि. नागपूर